INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# महात्मा गांधींचे स्त्रीविषयक विचार

## (Mahatma Gandhi's thoughts on women)

**डॉ. कांतराव किसनराव कलाणे**
इतिहास विभाग प्रमुख,
प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय,
नेकनूर, ता.जि. बीड (महाराष्ट्र,भारत)
E-mail: kalanekantrao@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/11.2025-53161635/IRJHIS2511004

**प्रस्तावना :**

भारत देशात अनेक धर्म निर्माण झाले व ते आजही आहेत; मात्र महात्मा गांधींजींनी 'मानवता' या नवीन धर्माची संकल्पना मानली होती. सत्य आणि अहिंसा हे त्यांच्या तत्वज्ञानाचे दोन आधारस्तंभ होते. गांधीजींनी आपल्या तत्वज्ञानातून मांडलेले सत्याचे प्रयोग हे केवळ भारतीयांनाच नव्हे तर जगातील अखिल मानवजातीला आदर्श ठरणारे आहेत. त्यांचे नाते माणसाशी व माणसातील विश्वात्मकतेशी होते. कोणत्याही नळकांड्यातून जन्माला येणारे त्यांचे विचार नव्हते तर जगाला कवेत घेऊन आश्वतकरू शकणारा शांतीचा मार्ग त्यामध्ये होता. समाजाचे कल्याण हा त्यांच्या सामाजिक विचाराचा मुख्य गाभा होता

स्त्री शक्तीवर महात्मा गांधींचा खूप मोठा विश्वास होता स्त्रीला अबला म्हणणे म्हणजे तिची निंदा करणे आहे हा पुरूषाने स्त्रीचा केलेला अपमान आहे. शक्तीचा अर्थ पाशवी शक्ती असा असेल तर खरोखरच पुरूषाच्या तुलनेत स्त्रीमध्ये पाशवेपणा कमी आहे आणि शक्तीला अर्थ नैतिक शक्ती असा असेल तर निश्तिपणे पुरूषाच्या तुलनेत स्त्री कितीतरी श्रेष्ठ आहे असे गांधीजींचे स्पष्ट मत होते पुरूषांनी स्त्रियांचे शोषण केले नसते तर स्त्री सगळ्या जगाला स्वत:ची अनंतशक्ती दाखवू शकली असती असे गांधीजींना वाटते. गांधीजींना स्त्रियांमधील सुप्त शक्तीची जाणीव प्रथम दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या वेळी झाली. भारतात सार्वजनिक कार्याला सुरूवात केल्यानंतर गांधीजींनी अनेक स्त्रियांना त्यामध्ये सहभागी कूरून घेतले. प्रस्तुत शोधनिबंधातून महात्मा गांधींचे स्त्रीविषयक विचार यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्देश :**

1) महात्मा गांधींचे स्त्रीविषयक विचार जाणून घेणे.

2) महात्मा गांधेंच्या स्त्रीविषयक विचारातून सामाजिक ऐक्य साधले जाऊ शकते का? याचा शोध घेणे.

**गृहीतकृत्ये :**

1) धर्म आणि नैतिकता यावर आधारित असे गांधीजींचे विचार होते.

2) गांधीजींच्या विचारात सत्याला व कृतीला अतिशय महत्व होते.

3) राष्ट्रनिर्मितीत गांधीजींचे स्त्रीविषयक विचार पोषक होते.

**महात्मा गांधींच्या विचारसरणीचा आधार :**

धार्मिक आणि नैतिक आधारावर महात्मा गांधींची राजकीय आणि सामाजिक विचारसरणी अवलंबून होती त्यांच्या धार्मिक आधारामध्ये मानवी जीवनातील सर्व कृतींना ईश्वराचे अधिष्ठान असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. तसेच त्यांच्या नैतिक आधारात त्यांना राजकारण आणि नितीचे विभक्तीकरण मान्य नव्हते.

**महात्मा गांधींचे स्त्रीविषयक विचार :**

महात्मा गांधींनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला स्त्री आणि पुरूष तत्वतःच समान आहेत. स्त्रीला पुरूषाऐवढीच निसर्गाकडून मानसिक शक्तीची देणगी मिळालेली आहे व अहिंसक लढा देण्यास तीच अधिक सक्षम व लायक आहे स्त्रियांनी सीता, दमयंती, द्रोपदी यांचा आदर्श आपल्यासमोर ठेवावा, खंबीर वृत्ती धारण करावी व स्वतःची आणि समाजाची नैतिक पातळी उंचवावी, असे झाल्यास त्या आजच्या समाजाचे निश्चितच नेतृत्व करू शकतील. गांधीजींमुळेच कस्तुरबा, अरूणा असफअली, कमला नेहरू, विजयालक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू, सुशीला नायर, राजकुमारी अमृत कौर अशी स्त्रीरत्ने भारतीय राजकारणात दैदीप्यमान झाली.[1]

महात्मा गांधींनी 'यंग इंडिया' तील आपल्या लेखात स्पष्टपणे सांगितले की, मुलींनी भारतीय भाषाबरोबरच इंग्रजी पुस्तकेही वाचावीत. मुलींचे शिक्षण हे लग्नाच्या बाजारात आपली किंमत वाढविण्यासाठी घेतले गेलेले नसावे. ज्या स्त्री- पुरूषांनावाङ्मयीन अभिरूची आहे त्यांनी इंग्रजी व जगातील इतर भाषांचा जरूर अभ्यास करावा व आपल्या ज्ञानाचा उपयोग देशासाठी, समाजासाठी करावा.[2]

8 मे, 1919 रोजी मुंबई येथील स्त्रियांच्या सभेत भाषण करताना गांधीजींनी स्त्रियांना उद्देशून म्हटले की, जोपर्यंत हिंदुस्थानातील स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने जगाच्या कारभारात, धार्मिक, राजकीय बाबतीत भाग घेत नाहीत तोपर्यंत हिंदुस्थान पूर्णतःसक्षम होणार नाही. एखाद्या व्यक्तीला अर्धांगाचा विकार झाल्यास त्याला कोणतेही काम व्यवस्थित करता येत नाही त्याचप्रमाणे जर स्त्रियांनीही, पुरूषांच्या कामात वाटा उचलला नाही तर आपला देश प्रगती करूच शकणार नाही.[3]

स्वदेशी वृत्ताचे पालन स्त्रियांच्या मदतीशिवायशक्य नाही कारण कुटुंब किंवा मुलांची काळजी ही स्त्रियाच घेतात शिवाय मुलांवर संस्कार करण्याचे कार्यही स्त्रियांचेच असते. म्हणून स्वदेशीचे संस्कार प्रथम स्त्रियांवर होणे गरजेचे आहे पूर्वीच्या काळी स्त्रिया घराघरातून सूत कातीत. त्यामुळे हिंदुस्थानात स्वाभिमानाचे प्रतिष्ठा त्या राखू शकत असत; मात्र आज परक्या कलेच्या मागे धावत जावून आपली पूर्वापार चालत आलेली कला मारत आहोत. हिंदुस्थानातील हवा/ जमीन वाईट असली तरी जशी आपण सोडत नाहीत तसेच हिंदुस्थानातील कपडे जाडे-भरडे असले तरी ते आपण वापरावेत. काही काळानंतर त्याची आपणास आपोआप सवय होईल. गांधीजींच्या या भाषणाचा मुंबईतील स्त्रियांवर मोठा परिणाम झाला व खूप मोठ्या प्रमाणावर स्त्रिया गांधीजींच्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या.[4]

बालविवाहाची वाईट रूढी जितकी शहरात तितकीच खेड्यातसुध्दा पसरलेली आहे ही रूढी बंद करायला लावण्याचे काम विशेषतः स्त्रियांचे आहे. म्हणून मी अखिल भारत महिला परिषदेला असा सल्ला देतो की, परिषदेला आपले नाव जर सार्थकी लावेयचे असेल तर तिने शहरातून उठून खेड्यांच्या कार्यक्षेत्रात उतरले पाहिजे... खरी गरज खेड्यातल्या स्त्रियांशी व्यक्तिगत संपर्क बांधण्याची आहे असा संबंध लगेच बांधला गेला तरी तेवढ्याने काम सोपे होते असे नाही, तथापि, केव्हा ना केव्हा या दिशेने सुरूवात तर करावीच लागेल. त्यानंतरच काही परिणाम निष्पन्न होण्याची अपेक्षा बाळगता येईल.[5]

स्त्रियांमध्ये पुरूषांपेक्षा अधिक स्वार्थत्याग, अधिक सहिष्णुता, अधिक साहस आहे. तिच्याशिवाय पुरूषाला कोणतेही अस्तित्व नाही. अहिंसा जर मानवजातीचा नियम असेल तर भविष्य स्त्रीच्या हाती आहे.... जेव्हा स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीची संधीमिळेल आणि ती परस्पर सहकार्य आणि त्याच्याशी संबंधित शक्तींचा पूर्णविकास करून घेईल तेव्हा जगाला स्त्रीशक्तीच्या आश्चर्यकारक अशा संपूर्ण अविष्काराचा परिचय होईल.[6]

आपल्या अर्धांगिनीच्या म्हणजे नारीजातीच्या दुरूपयोगाकरिता पुरूष जबाबदार आहे. पुरूषाचे कोणते कृत्य सर्वात जास्त हिनपणाचे, धक्कादायक वा पाशवीपणाचे असेल तर ते हे आहे. परंतु ही नारी अबला नाही नारी जात निश्चितपणे पुरूषाच्या तुलनेत अधिक उदात्त आहे. आजही नारी त्याग, विनम्रता, मूकपणे दुख सहन करणे, श्रध्दा आणि ज्ञान यांची प्रतिमूर्ती आहे.[7]

स्त्री ही स्वार्थ त्यागाची मूर्ती आहे. परंतु आपण पुरूषांपेक्षा किती श्रेष्ठ आहोत हेतिला दुर्देवाने कळत नाही स्टॉलेस्टॉय सांगत असत त्याप्रमाणे स्त्रिया पुरूषाच्या संमोहक प्रभावाखाली अजूनही वावरत आहेत. त्यांना जर अहिंसेच्या शक्तीचा परिचय झाला तर त्या स्वत: ला अबला म्हणवून घ्यायला कधीही तयार होणार नाहीत.[8]

जो तरूण विवाहाकरिता हुंड्याची अट ठेवतो तो आपल्या शिक्षणालाआणि देशाला बदनाम करतो व त्याला स्त्रियांबद्दल आदर नसल्याचे सिध्द करतो... हुंडा प्रथेच्या विरोधात जोरदार जनमत तयार केले पाहिजे आणि ज्या युवकाने या पापाच्या पैशांनी आपले हात काळे केले असतील त्याला बहिष्कृत केले पाहिजे. मुलींच्या आई-वलांनी पदव्यांच्या झगमगाटाने दिपून जाऊ नये अणि आपल्या मुलीकरिता खऱ्या वीर युवकाचा शोध घेण्याकरिता आपल्या जातीबाहेर वा प्रांताबाहेर जाण्यात संकोच करू नये.[9]

स्त्रियांच्या हक्कांच्या बाबतीत गांधीजी म्हणतात मी कोणतीही तडजोड करू शकत नाही पुरूषांवर नसलेले कोणतेही कायदेशीर बंधन स्त्रियांवरही नसावे. मी माझ्या मुलांशी आणि मुलींशी एकसारखा व्यवहार केला पाहिजे... पुरूषांनी स्त्रियांना योग्य स्थान देणे शिकले पाहिजे. ज्या देशात वा समुदायात स्त्रियांचा योग्य आदर होत नाही त्या देशाला सुसंस्कृत म्हणता येऊ शकत नाही.[10]

सविनय कायदेभंग चळवळ हा गांधी आंदोलनातील महत्त्वाचा टप्पा होय. सायमन कमिशनला झालेला विरोध, नेहरू अहवाल, बार्डोलीचा सत्याग्रह, लाहोर अधिवेशनातील स्वातंत्र्याची मागणी यामुळे संपूर्ण भारतात मोठी राजकीय जागृती निर्माण झाली होतीया पार्श्वभूमीवरच 1930 मध्ये मिठाचा कायदा मोडून त्यांनी सविनय कायदेभंग चळवळीचाश्रीगणेशा केला. या चळवळीत स्त्रियांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतल्याचे कारण गांधीविचारांचा प्रभाव, वसाहतवादी सत्तेची दडपशाही आणि भारतीय समाजामध्ये झालेली जागृती हे होय. स्त्रियांच्या सहभागाबाबत गांधीजींच्या दृष्टीने तीन महत्त्वपूर्ण गुण त्यांच्याजवळ होते तेम्हणजे स्वार्थ त्याग, अहिंसा आणि प्रामाणिकपणा हे होय. स्त्री ही कुटुंबाचा आधार आणि कुटुंब राष्ट्राचा आधार असल्याने राष्ट्रीय व सामाजिक कार्यात स्त्रियांनी समोर यावे असे गांधीजींचे मत होते.[11] तसेच स्त्री शक्तीची अचूक महती ओळखून गांधीजींनी त्यांना राष्ट्रीय आंदोलनात सहभागी करून घेतले.[12] त्यांच्या या या सहभागाबद्दल एच.एन. बेल्सफर्ड आणि जी. स्लेकोंब यांच्यासारखे पाश्चिमात्य निरीक्षकही कबुली देऊ लागले की, अवघ्या चोवीस तासांत गांधीजींनी भारतीय स्त्रिला तिच्या परंपरागत बंधनातून मुक्त करून ती सबला आहे हे दाखवून दिलेहा चमत्कारच मानावयाला हवा.[13] स्त्रियांच्या शिक्षणासाठी आपले आयुष्य पणाला लावणाऱ्या महर्षी कर्वेनी सांगितले की, माझ्या इतक्या वर्षांच्या प्रयत्नांनी जेवढी जागृती झाली नाही तेवढी गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहामुळे झाली.[14]

महात्मा गांधीजींचे वरील सर्व स्त्रिविषयक विचार पाहता असे दिसून येते की, स्त्री शक्ती जागृत करण्याचा प्रयत्न गांधीजींनी केला. तसेच पुरूषाच्या बरोबरीने स्त्रियांनाही स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेतले गांधीजींनी सुरू केलेल्या सत्याग्रह व कायदेभंगाच्या

चळवळीतील स्त्रियांचा सहभाग म्हणजे स्त्री अबला नाही हे सिध्द होते. जगातील सर्व मानव समान आहेत हे गांधीजींच्या विचारप्रणालीचे प्राणतत्व होते. स्त्री-पुरूष समान असून स्त्रीला पुरूषांएवढीच निसर्गाकडून मानसिक शक्तीची देणगीमिळालेली आहे. स्त्रियांबद्दलची आपली अपेक्षा व्यक्त करताना गांधीजी नेहमी म्हणत की, स्त्रियांनी सीता, दमयंती, द्रोपदी यांचा आदर्श आपल्यासमोर ठेवून खंबीर कृती धारण करावी व स्वत:ची आणि समाजाची नैतिक पातळी उंचवावी. थोडक्यात धर्म आणि नैतिकतेवर आधारित गांधीजींचे स्त्रेविषयक विचार होते. त्यांच्या या विचारात सत्याला आणि कृतीला अतिशय महत्त्व होते.

**सारांश :**

सामाजिक समानता आणि राष्ट्रीय एकात्मता यांना गांधीजींच्या विचारात अत्यंत महत्त्वाचे स्थान होते व्यक्तीचे मुलभूत हक्क, समानता, सामाजिक न्याय, समंजस्य अशा तत्वांच्या आधारे येथील राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनाची पुनर्बांधणी केल्याशिवाय राजकीय ऐक्य प्रस्थापित होणार नाही हे गांधीजींनी ओळखले होते. म्हणून हिंदू मुसलमान, सुशिक्षित, अशिक्षित, स्त्री-पुरूष, शहरी, खेडूत, श्रीमंत, गरीब यांच्यातील दुरावा नाहीसा करून त्यांना एका राजकीय प्रवाहात सामील करून घेण्याच्या दृष्टीने त्यांनी विधायक कार्क्रमाची आखणी केली. स्त्री आणि पुरूषांमध्ये एकाच आत्म्याचा निवास आहे स्त्री किंवा पुरूष यांच्याशिवाय हे जग चालणारच नाही असे गांधीजींचे स्पष्ट मत होते.

**निष्कर्ष :**

1) महात्मा गांधीच्या विचारांमध्येव्यक्तीमत्वामध्ये परिवर्तनशिलता दिसून येते.
2) धर्म आणि नैतिकतेवर आधारित गांधीजींचे स्त्रीविषयक विचार होते.
3) राष्ट्रनिर्मितीत गांधीजींचे स्त्रीविषयकविचार पोषक ठरतात.
4) महात्मा गांधींच्या स्त्रीविषयक विचारातून सामाजिक ऐक्य साधले गेले.

**संदर्भ सूची:**

1) Women and Social injustice- by M.K. Gandhiji-P.8.
2) History of India - by S.P. Chaube- P-566.
3) महात्मा गांधींचे संकलित वाङ्मय लेखसंग्रह 15 ऑगस्ट, 1918, संचालक, प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, पृष्ठ 358-359.
4) उपरोक्त, पृ. 359.
5) बोरीकर दिनकर (संपा.), माझ्या स्वप्नातील ग्रामीण भारत: महात्मा गांधी, मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती, नांदेड, साकार मुद्रणालय, औरंगोबाद पृ. 23.
6) हेडा ब्रिजमोहन (अनु.), महात्मा गांधींचे विचार, नवजीवन प्रकाश मदिर, अहमदाबाद, पृ. 318.
7) तत्रैव, पृ. 317.
8) तत्रैव, पृ. 318.
9) तत्रैव, पृ. 326.
10) तत्रैव, पृ. 323, 325.

11) दीक्षित ना.सी., भारताचा इतिहास, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स नागपूर, प्रथमावृत्ती, जून 2004, पृ. 261.

12) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 16 जानेवारी, 2007, पृ. 1122.

13) वाळींबे वि.स., सत्तावन्न ते सत्तेचाळीस, राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, 15 ऑगस्ट, 1998, पृ. 693.

14) देसाई नारायणभाई, नारी, गांधी तत्वज्ञान मंदिर, धुळे, ऑक्टोबर, 2006.

International Research Journal of Humanities and Interdisciplinary Studies
IRJHIS